# घोषणा

**विषय :-** मागासवर्गीय उमेदवारांनी सवलतीची फी भरली तरी खुल्या प्रवर्गाच्या पदासाठी विचार होणेबाबत..

दिनांक ०१ एप्रिल, २०१४ च्या आयोगाच्या निर्णयानुसार, आयोगाच्या परीक्षेतील मागासवर्गीय उमेदवारांनी सवलतीची फी भरल्यास त्यांचा फक्त त्यांच्या राखीव प्रवर्गासाठी विचार केला जात होता. त्यामुळे आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रक्रियेमध्ये अर्ज भरताना मागासवर्गीय उमेदवारांनी सवलतीच्या फीचा पर्याय निवडल्यास त्यांना ते खुल्या प्रवर्गासाठीही अर्ज करु इच्छितात काय? असा प्रश्न विचारला जात असे व पूर्ण फी न भरल्यास खुल्या प्रवर्गासाठी विचार होणार नाही अशी सूचना दिली जात असे.

२. अलीकडे, दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी आयोगाने उपरोक्त निर्णयात सुधारणा करुन असा निर्णय घेतला आहे की, मागासवर्गीय उमेदवारांनी सवलतीची फी भरल्यास, खुल्या प्रवर्गाच्या पदांकरिता विचार होण्यासाठी ती सवलत समजणार नाही. म्हणजेच सवलतीची फी भरली तरीही त्यांचा राखीव पदाबरोबरच खुल्या पदासाठीही विचार केला जाईल. या सुधारित निर्णयामुळे ऑनलाईन अर्ज प्रणाली प्रक्रियेमध्ये फीबाबत पूर्वी येणारी सूचना आता येत नाही. सध्या महाराष्ट्र दुय्यम सेवा पूर्व परीक्षेसाठी (राज्य कर निरीक्षक, पोलीस उप निरीक्षक व सहायक कक्ष अधिकारी) अर्ज प्रक्रिया सुरु आहे. त्या अनुषंगाने काही मागासावर्गीय उमेदवारांकडून याबाबत विचारणा होत आहे. याबाबतचा संभ्रम दूर करण्यासाठी याद्वारे स्पष्ट करण्यात येत आहे की, **आयोगाच्या परीक्षांसाठी मागासवर्गीय उमेदवारांनी सवलतीची फी भरणे पुरेसे आहे. खुल्या प्रवर्गातील पदांसाठी विचार होण्याकरिता मागासवर्गीय उमेदवारांनी संपूर्ण फी (म्हणजेच बिगर सवलतीची फी) भरणे आवश्यक नाही. सवलतीची फी भरल्यास त्यांचा विचार त्यांच्या प्रवर्गातील राखीव पदाबरोबरच खुल्या प्रवर्गातील पदासाठीही करण्यात येईल. केवळ सवलतीची फी भरल्याच्या कारणास्तव, त्यांना खुल्या पदांकरिता अपात्र समजले जाणार नाही.**

दिनांक : ०५/०३/२०१८

सचिव<br>
महाराष्ट्र लोकसेवा आयोग